## निमंत्रण पत्रिका

**निमंत्रण पत्रिका नमुना समजून घ्या.**

• वाचा

पाळंदूरच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देण्यासाठी गावकऱ्यांना निमंत्रण दिले आहे. ग्रामपंचायत कार्यालयाजवळच्या सूचना फलकावर चौथीच्या मुलांनी काय लिहिले आहे ते काळजीपूर्वक वाचा.

### जाहीर निमंत्रण

**पाळंदूरमधील सर्व लोकांसाठी**

दरवर्षीप्रमाणे आपल्या शाळेत, म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर येथे 'मुलांचा दिवस' या उपक्रमाअंतर्गत प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांनी बनवलेल्या विविध वस्तू व भेटकार्डे, रेखाटलेले तक्ते, मातीकाम, चित्रे आणि शाळेच्या बागेत फुलवलेल्या भाज्या व फळे यांची प्रदर्शनी भरवली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी लाखनीवरून 'विदर्भ आनंदशिक्षण मंडळा'चे कार्यकर्ते श्री. बालसू नागोटी आणि श्रीमती सुवर्णाताई गजभिये उपस्थित राहणार आहेत. ते कलाकुसरीच्या वस्तू बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवतील. तरी आपण सगळ्यांनी उपस्थित राहून आमचा उत्साह वाढवावा, ही विनंती.

शनिवार, दि. .....................

**ठिकाण**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर.

**प्रदर्शनीची वेळ :** सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००

**प्रात्यक्षिक :** सकाळी ११.३० ते दुपारी १.३०

**✲ खास आकर्षण ✲**
गेल्या वर्षीच्या सहलीची वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रे.

आपले
सर्व विद्यार्थी, इयत्ता चौथी
जि.प.प्रा. शाळा, पाळंदूर.

## स्वाध्याय

प्र. १. निमंत्रण पत्रिका काळजीपूर्वक वाचा. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) निमंत्रण कोणी दिले आहे ?

(आ) कार्यक्रमाचे स्वरूप काय आहे ?

(इ) कार्यक्रमासाठी पाहुणे कोठून येणार आहेत ?

(ई) या निमंत्रणाला 'जाहीर निमंत्रण' असे का म्हटले आहे ?

(उ) असा कार्यक्रम पाळंदूरच्या शाळेत गेल्या वर्षी झाला असेल का ? ते कशावरून समजले ?

(ऊ) निमंत्रण वाचून प्रियंकाची आई म्हणाली, "बरं झालं. दिवसभर शाळेत थकली, तरी मुलांना दुसऱ्या दिवशी विश्रांती मिळेल." त्या असे का म्हणाल्या असतील ?

(ए) समजा, असे प्रदर्शन तुमच्या शाळेत भरवायचे आहे. त्यासाठी काय काय तयारी करावी लागेल ? आपापसात तसेच शिक्षकांशी चर्चा करून उत्तर लिहा.

(ऐ) तुम्हांला असे निमंत्रण गावकऱ्यांना द्यायचे असेल, तर तुम्ही 'खास आकर्षण' म्हणून काय काय लिहाल ?

टेस्ट सोडवा. ऑनलाईन टेस्ट

## इयत्ता – चौथी विषय – गणित

विभाग दुसरा

## ९. शाब्दिक उदाहरणे : बेरीज – वजाबाकी

### स्वाध्याय

१. अब्दुलकडे ७२० मणी होते. त्याने त्यांपैकी ६४८ मणी विकले, तर त्याच्याकडे किती मणी राहिले ?

२. जोसेफने ६,३५० रुपयांची टेबले आणि ३,८०० रुपयांच्या खुर्च्या विकत घेतल्या, तर खुर्च्यांपेक्षा टेबलांसाठी किती जास्त खर्च झाला ?

३. राघवरावांनी ३,५८७ रुपयांची बियाणी आणि ४,६५५ रुपयांची खते विकत घेतली, तर बियाण्यांपेक्षा खतांवर किती जास्त खर्च झाला ?

४. निशाच्या घराच्या वीजमीटरमध्ये १ जूनला 0 3 4 5 2 असे वाचन होते. १ जुलैचे वाचन 0 3 5 3 1 झाले, तर जून महिन्यात किती युनिट विजेचा वापर झाला ?

५. सन २००१ च्या जनगणनेत एका गावाची लोकसंख्या ६२,९४७ होती. सन २०११ च्या जनगणनेत ती ७४,४०५ झाली, तर या काळात त्या गावाच्या लोकसंख्येत किती वाढ झाली ?

वरील शाब्दिक उदाहरणे सोडवा.टेस्ट सोडवा

नवीन टेस्ट – ऑनलाईन टेस्ट

## Std – Fourth Sub – Maths (Semi)

Part Two

### 9. Word Problems: Addition and Subtraction

**Exercise**

(1) Abdul had 720 beads. He sold 648 of them. How many beads does he have left?

(2) Joseph bought tables worth ₹6,350 and chairs worth ₹3,800. How much more did the tables cost than the chairs?

(3) Ragahvrao bought seeds worth ₹3,587 and fertilizers worth ₹4,655. How much more than the seeds did the fertilizers cost?

(4) The reading of the electricity meter in Nisha's house was 0 3 4 5 2 on the 1st of June. On the 1st of July, it was 0 3 5 3 1. How many units of electricity were used in June?

(5) In a census taken in 2001, the population of a village was 62,947. The census of the year 2011 listed the population as 74,405. How much did the population increase in the meantime?

**Read and understand.**

## इयत्ता – चौथी विषय – इंग्रजी

### A GARDEN OF WORDS


| | | | | |
|---|---|---|---|---|
| always | dream | high | nice | soft |
| before | dreaming | just | past | spilled |
| better | even | know | people | surprise |
| bought | ever | lost | pot | tasty |
| butter | flew | make | price | thick |
| buy | from | market | rich | toss |
| carrying | gently | milk | rolled | tossed |
| churn | get | money | sell | wait |
| creamy | golden | moved | should | wear |
| does | held | much | show | your |

**1. Listen carefully and tick off the words in your table.**

* always * churn * dreaming * gently * market
* nice * price * should * soft * surprise * toss

## १४. नकाशा आणि खुणा

- अंजूचे घर व परिसराचा नकाशा खाली दिला आहे. तुमच्या परिसराचा नकाशा तुम्ही काढल्यावर या नकाशाशी जुळवून पहा. तुमच्या नकाशात काही उणिवा असतील तर दूर करा.




**आराखड्याचे निरीक्षण करा.**

ऑनलाईन टेस्ट



## १२. पुरंदरचा वेढा व तह

**स्वाध्याय**

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) त्या वेळची मुघली मुलखातील मोठी व्यापारपेठ म्हणजे...... .

(पुणे, सुरत, दिल्ली)

(आ) पुरंदरचा किल्लेदार ......... मोठा जिद्दीचा वीर होता.

(बाजीप्रभू, तानाजी, मुरारबाजी)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शिवरायांनी सुरत शहरावर छापा का घातला?

(आ) दिलेरखानाने पुरंदरला वेढा का दिला ?

(इ) मुघलांशी तह करण्याचे शिवरायांनी का ठरवले ?

(ई) पुरंदरच्या तहात शिवरायांनी मुघलांना कोणता मुलूख देण्याचे कबूल केले ?

**सराव करा व प्रश्न बनवा.** ऑनलाईन टेस्ट

| इयत्ता चौथी - मराठी | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
|---|---|
| 14. मिठाचा शोध | Click Here |
| 15. आनंदाचं झाड | Click Here |
| 16. झुळूक मी व्हावे | Click Here |
| 17. म्हणींच्या गमती | Click Here |
| **इयत्ता चौथी - गणित** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| शाब्दिक उदाहरणे-बेरीज | Click Here |
| शाब्दिक उदाहरणे-वजाबाकी | Click Here |
| अपूर्णांक | लवकरच |
| मापन | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 1** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 14 नकाशा आणि खुणा | Click Here |
| 15. माझा जिल्हा माझे राज्य | लवकरच |
| 16. दिवस व रात्र | लवकरच |
| 17. माझी जडणघडण | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 2** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 12. पुरंदरचा वेढा व तह | Click Here |
| 13. बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या | लवकरच |
| 14. गड आला पण सिंह गेला | लवकरच |